**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्टे सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २३० । मंगळवार ९ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## चोरटा पार्किंगमध्ये, सुरक्षारक्षक गेटबाहेर!

# सर्जेपुरा चौकातील राजमाता मिलच्या पार्किंगमध्ये चोऱ्यांचे सत्र

### सीसीटीव्हीत घटना कैद । चोरटा एक तास पार्किंगमध्ये



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील सर्जेपुरा चौक येथील राजमाता मिल या साड्यांच्या दुकानाच्या पार्किंगमध्ये एका चोरट्याने सुमारे एक तास तळ ठोकून दुचाकीच्या डिक्कीतून दुकानात खरेदीसाठी आलेल्या महिला ग्राहकाचा मोबाईल लांबविल्याची घटना काल (दि. ८) रोजी दुपारच्या सुमारास घडली. दरम्यान, या घटनेच्या कालावधीत पार्किंगची व्यवस्था पाहणारे तीन सुरक्षारक्षक गेटबाहेर बसून असल्याचे पुढे आल्याने ग्राहकांनी संताप व्यक्त केला. या दुकानाच्या पार्किंगमध्ये सातत्याने चोरीच्या घटना घडत असून, ग्राहक महिलांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. ■ पान ४ वर

### पार्किंगमधील घटनांची जबाबदारी आमची नसते!

सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरटा तासभर पार्किंगमध्ये तोंडाला रुमाल बांधून संशयास्पदरित्या वावरत होता व त्याने या कालावधीत अनेक दुचाकींमधून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले. संबंधित महिला ग्राहकाने याचा जाब विचारला असता, पार्किंगमधील घटनांची जबाबदारी आमच्यावर नसते, असे अजब उत्तर दुकानाच्या व्यवस्थापनाने दिले.

### सुरक्षारक्षक, चोरट्यांचे साटेलोटे?

या ठिकाणी सातत्याने महिला ग्राहकांना लक्ष्य करून पार्किंगमध्ये चो–या होत असल्याचे पुढे आले असून, अनेक तक्रारी पोलिसांपर्यंत येत नाहीत. चोरट्याचा तासाभरापेक्षा जास्त बिनधास्त वावर व पार्किंगमधील अनेक दुचाकींची केलेली उचकापाचक व या कालावधीत सुरक्षारक्षकांनी डोकावूनही न पाहणे हे सर्व संशयास्पद असल्याचा आरोप ग्राहकांनी केला असून, सुरक्षारक्षक व चोरटा यांचे काही साटेलोटे तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# सीना नदी रुंदीकरण कामाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप यांच्याकडून पाहणी

१४ किलोमीटर वाहणाऱ्या सीना नदीचे बदलणार रूप; पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर काम प्रगतीपथावर
सीना नदीच्या सौंदर्यीकरणासाठी अतिरिक्त निधी देणार – पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील
अतिक्रमणमुक्त, स्वच्छ आणि प्रवाही सीना नदीसाठी प्रशासन सज्ज; नगरकरांना मिळणार नवे पर्यटनस्थळ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या, पर्यावरणीय समतोलाला बळकटी देणाऱ्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक वारसा जपणाऱ्या महत्त्वाकांक्षी सीना नदी रुंदीकरण, खोलीकरण व सुशोभीकरण प्रकल्पाची पाहणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी केली. शहरातून तब्बल १४ किलोमीटर वाहणाऱ्या सीना नदीचे संपूर्ण रूपांतर करण्याचा संकल्प प्रशासनाने केला असून पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, ज्येष्ठ नेते ॲड. अभय आगरकर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक मनोज कोतकर, विकी जगताप, अमोल गाडे, किशोर डागवले, निखिल वारे, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, गोरख पडोळे, दत्ता गाडळकर, अनिल ढवण, ऋग्वेद गंधे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीचे सुशोभीकरण आणि पुनरुज्जीवन व्हावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आता नदीच्या सौंदर्यीकरणासाठी स्वतंत्र आणि व्यापक प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवावा. त्यासाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल.

ते पुढे म्हणाले की, सीना नदी ही केवळ जलवाहिनी नसून अहिल्यानगर शहराची मानबिंदू आहे. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे आणि वाढत्या अतिक्रमणांमुळे नदीचे मूळ स्वरूप नष्ट होऊ लागले होते. काही ठिकाणी तर नदीचे पात्र अस्तित्वात आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. ■ पान ४ वर

# जिल्ह्यामध्ये महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये पीआय दर्जाचे अधिकारी नेमण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील भिंगार, एमआयडीसी तसेच नगर तालुका यांसारख्या महत्त्वाच्या व संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) प्रभारी म्हणून कामकाज पाहत असल्याने या ठिकाणी पूर्णवेळ पोलीस निरीक्षक (पीआय) दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले यावेली विश्व मानवाधिकार परिषदेचे प्रदेशाध्यक्ष नावेद शेख याच्या उपस्थितीत देण्यांत आलें यावेळी जिल्हाध्यक्ष अजीम शेख, अल्ताफ शेख, सोहेल शेख, अरुण कोकडे, शरीफ सय्यद, सनाउल्लाहा तांबटकर आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका ही पोलीस ठाणी क्षेत्रफळ, लोकसंख्या व संवेदनशीलतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. मात्र या ठिकाणी सध्या एपीआय दर्जाचे अधिकारी प्रभारी म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते. आगामी सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व ■ पान ४ वर

# श्रीरामपूरमध्ये घरफोडी करणारे दोन सराईत एलसीबीकडून जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर येथे झालेल्या घरफोडीचा छडा लावत दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून तब्बल ६ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, श्रीरामपुर तालुका पोलीस ठाण्यातील दोन गंभीर गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

वांगी बुद्रुक (ता. श्रीरामपूर) येथील रहिवासी सोपान चंद्रभान थोरात हे १६ मे रोजी दुपारी घराला कुलूप लावून जवळच असलेल्या वस्तीवर जेवणासाठी गेले होते. याच संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी श्रीरामपूर



तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आत्तार, विशाल तनपुरे आणि चालक अरुण मोरे यांच्या पथकाने तांत्रिक कौशल्य आणि गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, हा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार स्वरूप उर्फ गुंड्या डिस्चार्ज काळे (वय ३०) आणि दऱ्या परांड्या भोसले (वय ३५, दोघे रा. अंतापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी केल्याचे निष्पन्न झाले.

हे आरोपी घोडेगाव ते शनिशिंगणापूर रोडवर दबा धरून

# सातासमुद्रापार दुमदुमला विठ्ठलनामाचा गजर!

### लंडनहून निघालेली ऐतिहासिक 'ग्लोबल वारी' पंढरपूरच्या वाटेवर; ११ देश, ५० दिवसांचा प्रवास । भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांनी रुजविलेल्या वारकरी संप्रदायाचा महिमा आता सातासमुद्रापार पोहोचला असून, 'ज्ञानबा–तुकाराम'चा जयघोष इंग्लंडच्या भूमीवर दुमदुमला आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणि विठ्ठल भक्तीचे प्रतीक असलेली आषाढी वारी यंदा जागतिक स्वरूपात साकारली असून, लंडनहून सुरू झालेली ऐतिहासिक 'ग्लोबल वारी' सध्या पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. वारकरी परंपरा, संत विचार आणि भारतीय संस्कृतीचा संदेश जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरत आहे.

शनिवारी (दि. ६ जून) लंडनमधील रॉयल विंडसर रेसकोर्स परिसरातून या वारीला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. श्रीक्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या हस्ते श्री विठ्ठलाच्या पादुकांचे पूजन करून वारीचे विधिवत प्रस्थान करण्यात आले. यावेळी युनायटेड किंगडमसह युरोपातील विविध देशांतील वारकरी, विठ्ठलभक्त, अनिवासी भारतीय आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगव्या पताका, तुळशीमाळ, टाळ–मृदुंगाचा निनाद, अभंगांचा





(छाया : बाबा पालवे)

गजर आणि 'पांडुरंग हरी', 'ज्ञानबा–तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. महाराष्ट्रातील वारीचे पारंपरिक आणि आध्यात्मिक वातावरण जणू काही इंग्लंडच्या भूमीवर अवतरल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

११ देशांचा प्रवास; आषाढी एकादशीला पंढरपूरात सांगता ही जागतिक वारी युनायटेड किंगडम, नेदरलँड्स, बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, झेक प्रजासत्ताक, पोलंड, हंगेरी, तुर्की, जॉर्जिया आणि भारत अशा ११ देशांतून प्रवास करणार आहे. सुमारे ५० दिवसांचा हा आध्यात्मिक प्रवास पूर्ण करून दिंडी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे २५ जुलै२०२६ रोजी पोहोचणार आहे.

प्रवासादरम्यान विविध शहरांमध्ये कीर्तन, अभंग गायन, सांस्कृतिक कार्यक्रम, संत साहित्याचे वाचन तसेच भारतीय संस्कृती आणि वारकरी परंपरेची माहिती देणारे उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे ही वारी केवळ धार्मिक न राहता सांस्कृतिक देवाणघेवाणीचेही प्रभावी माध्यम ठरणार आहे.

चिंचपूर इजदेच्या सुपुत्राची जागतिक संकल्पना

या अभिनव उपक्रमामागे अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील चिंचपूर इजदे गावचे सुपुत्र डॉ. अनिल एकनाथ खेडकर यांची दूरदृष्टी आणि प्रेरणा आहे. पुण्यात शिक्षण पूर्ण केल्यानंतर २००८ मध्ये ते लंडनमध्ये स्थायिक झाले. वैद्यकीय आणि औषधनिर्माण क्षेत्रात कार्यरत असतानाही त्यांनी वारकरी संप्रदायाशी असलेले आपले नाते अखंड जपले आहे. पीएच.डी. (क्लिनिकल रिसर्च), मास्टर इन फार्मास्युटिकल सायन्सेस आणि बॅचलर ऑफ फार्मसी अशी उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या डॉ. खेडकर यांना औषधनिर्माण नियामक व्यवहार क्षेत्रात १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. २०२३ मध्ये त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ फार्मास्युटिकल ■ पान ४ वर

> यूकेमध्ये वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील बांधवांना एकत्र आणून भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि महाराष्ट्राची ओळख परदेशात जपण्याचे व ती अधिक व्यापक करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. अनिल खेडकर यांच्या प्रयत्नांतून होत आहे. तरुणांनी एकत्र येऊन संस्कृती संवर्धनाची ही चळवळ पुढे नेणे अत्यंत अभिमानास्पद आहे. अशा उपक्रमांना सर्वांनी सहकार्य व पाठबळ देणे ही काळाची गरज आहे.
>
> **डॉ. नामदेव शास्त्री,** भगवानगड.

## दै. आकर्षण निवडक

### कन्यारत्नाच्या आगमनाचे वृक्षारोपणाने स्वागत




अहिल्यानगर - समाजात मुलीच्या जन्माचे विविध प्रकारे स्वागत केले जाते. मात्र, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मुलीच्या जन्माचा आनंद वृक्षारोपणाद्वारे साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम शहरातील पवार कुटुंबीयांनी राबविला आहे. घरात कन्यारत्नाचे आगमन झाल्यानंतर तिच्या नावाने रोपाची लागवड करून त्याचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमातून मुलींचा सन्मान आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही मूल्यांचा सुंदर संगम घडवून आणण्यात आला. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्ष लतिका पवार यांची नात तसेच इंजि. प्रसाद पवार व प्रांजल पवार या दाम्पत्यांना नुकतेच कन्यारत्न प्राप्त झाले. कुटुंबात नव्या पाहुणीच्या आगमनाने आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या आनंदाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत कुटुंबीयांनी वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबविला.'आजचे रोप उद्याचा श्वास' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांतर्गत कन्येच्या नावाने रोप लावण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता त्या रोपाचे नियमित संगोपन, संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारीही कुटुंबीयांनी स्वीकारली आहे.

### आकर्षक भेटवस्तू खरेदीसाठी संसार सुविधामध्ये हौशी गृहिणींची गर्दी

अहिल्यानगर- अधिक मास सुरू झाल्यापासून आकर्षक भेटवस्तू खरेदीसाठी येथील संसार सुविधा दालनामध्ये हौशी गृहिणींची चांगलीच गर्दी दिसू लागली आहे.सौ.आशाबाई डुंगरवाल यांनी १९८९ मध्ये १०० स्क्वेअर फूट जागेत सुरू केलेले हे दालन आज १८०० स्क्वेअर फूट मध्ये प्रशस्त विस्तार करत ग्राहक सेवेत दाखल झालेले आहे. सौ.आशाबाईचे सुपुत्र सचिन हे या दालनात सेवा देण्यासाठी तत्पर असलेले पहावयास मिळतात. अगदी ५० रूपयांपासून २ हजार रुपयांपर्यंतच्या नित्योपयोगी दर्जेदार वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सध्याच्या धोंड्याच्या महिन्यात लाडक्या जावयाला आपलेपणाने द्यावयाच्या अनेकविध आकर्षक भेटवस्तू येथे उपलब्ध आहेत. पितळेचा थाळी सेट, तांब्याचा थाळी सेट, जर्मन-सिल्वर पूजासेट, स्टीलवर राजस्थानी मिनावर्क केलेली फॅन्सी ताटं, डबे, तांबे तसेच मिना सर्व्हिंग ट्रे, मिना वर्क असलेला चौरंग, कॉपर हंडी, तांबे आणि पितळेची मुखवास बाटली, चार्जेबल ट्रॅव्हलिंग फॅन, अर्धा लिटर क्षमतेचा इलेक्ट्रीक ट्रॅव्हल कुकर, चहा-दूध गरम करण्यासाठीची फोल्डींग किटली, प्रवासात उपयुक्त चार्जेबल ज्युसर, खाद्य पदार्थ गरम रहाण्यासाठी फॉईल टिफीन बॅग,गार-गरम पाण्यासाठी व्हॅक्यूम बॉल, पंचपात्रसारखा दिसणारा कॉपर ड्रायफ्रुट सेट, विविध आकारातील छान कलाकुसर केलेले ड्रायफ्रुट सेट, मसाले ठेवण्यासाठी स्टीलचा आकर्षक डबा, बाथरूममधील डाग घालवणारे प्रभावी लिक्वीड आणि स्प्रे असे घराचे घरपण जपणारे आणि घराला परिपूर्ण बनवणारे बरेच काही या दिव्य संसार सुविधा दालनामध्ये उपलब्ध आहे.

### निवृत्त शिक्षिका रत्ना उंडे यांचे निधन

अहिल्यानगर - भिंगार येथील निवृत्त शिक्षिका



रत्ना रमेश उंडे यांचे नुकतेच हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्या ६४ वर्षांच्या होत्या. त्यांच्यामागे पती, मुलगा, दोन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत त्यांनी ३४ वर्षे सेवा केली. शिस्तप्रिय शिक्षिका म्हणून त्यांची ख्याती होती. निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश उंडे यांच्या त्या पत्नी होत.

## सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्राच्या सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत-महंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली महाराष्ट्राची भूमी ही अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाची भूमी म्हणून ओळखली जाते. संतांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी दिलेले जीवनमूल्यांचे संदेश धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचत असतात. अशाच अध्यात्मिक वातावरणाने नटलेल्या सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्र परिसराच्या सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

नगरसेविका मीनाताई संजय चोपडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून या कामामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलून आले आहे. मंदिर परिसर आता केवळ धार्मिक स्थळ न राहता अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणास्थान बनला आहे.

लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, ''आपली संस्कृती ही जगातील सर्वात समृद्ध संस्कृती आहे. संतांचे विचार समाजाला दिशा देणारे आणि माणुसकीची शिकवण देणारे आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर हे केवळ पूजेचे ठिकाण नसून अध्यात्मिकतेचे, संस्कारांचे आणि सामाजिक ऐक्याचे केंद्र बनले आहे. येथे वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडत असतात. त्यामुळे समाजात सकारात्मक विचारांची पेरणी होत असते.

ते पुढे म्हणाले की, ''संत गाडगेबाबा दरवर्षी आषाढी एकादशीची दिंडी काढायचे, मात्र ते मंदिरात न जाता त्या परिसरातील अस्वच्छता पाहून स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छता करायचे. समाजाला स्वच्छतेचा संदेश देणारा हा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आपणही आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देताना त्यांनी सांगितले की, ''पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. संत तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असा संदेश देत वृक्षांचे महत्त्व समाजाला पटवून दिले होते. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन आणि संवर्धन करावे, ही काळाची गरज आहे.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले की, ''सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात आल्यानंतर अक्कलकोटच्या पवित्र भूमीत आल्याचा भास होतो. येथे निर्माण झालेले अध्यात्मिक वातावरण मनाला समाधान देणारे आहे. संत-महंतांचे विचार समाजाला प्रेरणा, ऊर्जा आणि सकारात्मक दिशा देणारे आहेत. माणुसकी म्हणजे माणसातील माणूस ओळखणे, त्यांची सेवा करणे आणि समाजासाठी काहीतरी देणे हा खरा परमार्थ आहे.

यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा म्हणाले की, ''आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून श्री स्वामी समर्थ मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध झाला. त्या माध्यमातून हे काम पूर्णत्वास गेले असून आज त्याचा लोकार्पण सोहळा संपन्न होत आहे. समाजोपयोगी आणि लोकहिताचे काम मार्गी लागल्याचे समाधान वाटत आहे.

## हरविलेले आणि चोरीस गेलेले महागडे मोबाईल शोधून केले मालकांच्या स्वाधीन

### पोनि. संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलिसांची कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** हरविलेला किंवा चोरीस गेलेला मोबाईल पुन्हा मिळणे ही अनेक नागरिकांसाठी केवळ एक आशाच ठरते. मात्र कोपरगाव तालुका पोलिसांनी आपल्या कार्यक्षमतेचा प्रत्यय देत हरविलेले तसेच चोरीस गेलेले चार महागडे मोबाईल फोन शोधून काढत संबंधित मूळ मालकांच्या ताब्यात दिले आहेत. या कारवाईमुळे मोबाईलधारकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कोपरगाव तालुका पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कोपरगाव शहरासह तालुक्यातील विविध भागांतून हरविलेल्या आणि चोरीस गेलेल्या मोबाईल फोनबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनने शोधमोहीम सुरू केली होती. तालुका पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस कर्मचारी अंजना भांगरे-झडे यांनी केंद्र सरकारच्या सीईआयआर अर्थात सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर पोर्टलच्या माध्यमातून या मोबाईलचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपास सुरू केला. मोबाईलच्या आयएमईआय क्रमांकाच्या आधारे करण्यात आलेल्या तांत्रिक विश्लेषणातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे चारही मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले. शोधून काढण्यात आलेले मोबाईल आज संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आले.

अनेकदा मोबाईल हरविल्यानंतर किंवा चोरीस गेल्यानंतर तो कायमचा गेला असे समजून नागरिक आशा सोडून देतात. मात्र कोपरगाव तालुका पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे हे मोबाईल पुन्हा मिळाल्याने संबंधित नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. मोबाईल परत मिळालेल्या नागरिकांनी कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन तसेच या मोहिमेत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

दरम्यान, हरविलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारच्या सीईआयआर पोर्टलचा प्रभावी वापर करत कोपरगाव तालुका पोलिसांनी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ केला असून या यशस्वी कारवाईची परिसरात चांगलीच चर्चा रंगली आहे. कोपरगाव तालुका पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## ग्रामसेवकाच्या बदलीच्या आश्वासनानंतर आमरण उपोषण मागे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** चनकवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक प्रशांत पाटील यांची एका आठवड्याच्या आत बदली करण्यात येईल, असे लेखी आश्वासन पंचायत समिती प्रशासनाकडून देण्यात आल्यानंतर ग्रामस्थांनी सुरू केलेले आमरण उपोषण सोमवारी मागे घेतले.

ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत विविध तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले होते. याबाबत पंचायत समितीच्या स्तरावर चर्चा होऊन ग्रामसेवकाची बदली करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर पंचायत समिती सदस्या सखुबाई झारगड यांच्या हस्ते उपोषणकर्ते रामराव बोटे यांना लिंबू सरबत पाजून उपोषण सोडविण्यात आले.

यावेळी सुनील तिजोरे, जालिंदर मोहिते, विजय ससाने, संतोष बोठे, नागनाथ ससाने, अशोक गायकवाड, अरुण खवले, मारुती गायकवाड, देविदास पिंपळे, कमलाबाई पिंपळे, दिगंबर बर्डे, योगेश बर्डे, बाबासाहेब मगरे, एकनाथ घुले, जया ससाने, उज्वला मगरे, सविता घुले, लताबाई गायकवाड, सविता ससाने, राहीबाई गायकवाड, ताराबाई खवले, सुनीता पेटारे, शंकर कदम, नानासाहेब कदम, लहू नाटकर, शरद मगरे, बबन मगरे व गुलाब मगरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने उपोषण स्थगित करण्यात आल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले.

## ०५ वे राज्यस्तरीय मिरग नक्षत्र मराठी साहित्य संमेलन वाईमध्ये लक्षवेधी ठरले कथालेखक देशमुख यांचे कथाकथन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के.एस.आय पब्लिकेशन व.विद्यानिकेतन शैक्षणिक संस्था आयोजजि राज्यस्तरीय मिरगे नक्षत्र मराठी साहित्य संमेलन,वाई येथे ०७ जून रोजी संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ डोलारे पालघर हे होते. संमेलनमध्ये कथाकथन, कवी संमेलन ,विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सन्मान, असे विविध कार्यक्रम संपन्न झाले.

मिरग नक्षत्र संमेलनमध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख अहिल्यानगर, यांनी हरवलेला संवाद ही कथा सादर केली. आजी आजोबांचा शेवटचा मित्र म्हणजे त्यांची नातवंडे. तर नातवंडांचा पहिला मित्र म्हणजे आजी आजोबा. यांच्या भावविश्वावर भाष्य करणारी कथा बाळासाहेब देशमुख यांनी सादर केली. सकस कथाक, देहबोली, आवाजातील चढ उतार, उत्कृष्ट शब्द फेक याद्वारे कथा , संमेलन मध्ये लक्षवेधी ठरली. त्या प्रसंगी सारे सभागृह मंत्रमुग्ध झाले होते. आजी आजोबांच्या सहवासात, नातवंडांवरती जे जे संस्कार होतात.

त्यातून एक सकस, राष्ट्राला तारणारी पिढी तयार होते. हल्लीची मुले, हुशार, चाणाक्ष व जिज्ञासू आहेत. आजी आजोबांच्या सुसंस्काराने चांगली जडणघडण करत, आपले आयुष्य घडवतात. हा लक्षवेधी संदेश रसिकांना मिळाला. कथाकथन कार्यक्रम प्रसंगी राज्यातून आलेले हजारो साहित्यिक उपस्थित होते. संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्यिक नागनाथ डोलारे यांच्या शुभहस्ते देशमुखांना सन्मानित करण्यात आले. जेष्ट साहित्यिक विलास पाटील यांनी स्वागत व आभार प्रदर्शन केले.

### गांधी महाविद्यालय कडा येथे पर्यावरण दिन उत्साहात साजरा

## पर्यावरणाचा समतोल ठेवणे महत्त्वाचे – प्रा. डॉ अशोक कोरडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची परिस्थिती, ज्यामध्ये हवा, पाणी, जमीन, वनस्पती आणि प्राणी यांचा समावेश होतो. सजीवांच्या अस्तित्वासाठी आणि निरोगी जीवनासाठी पर्यावरण अत्यंत आवश्यक आहे. हे आपल्याला जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गोष्टी पुरवते आणि निसर्गाचा समतोल राखण्यास मदत करते. पर्यावरणाचे महत्त्व खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते:अन्न आणि पाणी: शेतीसाठी आवश्यक सूर्यप्रकाश, माती आणि पाणी हे सर्व पर्यावरणातून मिळते.

याशिवाय फळे, भाज्या आणि इतर खाद्यपदार्थ आपल्याला याच संसाधनांतून मिळतात.शुद्ध हवा आणि ऑक्सिजन: झाडे आणि वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साईड शोषून घेऊन ऑक्सिजन सोडतात, ज्यामुळे मानवाला श्वास घेणे शक्य होते.नैसर्गिक संतुलन: पर्यावरणामध्ये जैविक (सजीव) आणि अजैविक (निर्जीव) घटकांची एक साखळी असते. या साखळीमुळे अन्नसाखळी आणि हवामानाचा समतोल राखला जातो.



औषधे आणि कच्चा माल: विविध प्रकारच्या वनस्पती, जंगले आणि प्राणी आपल्याला औषधांसाठी घटक तसेच उद्योगधंद्यांसाठी लाकूड व इतर कच्चा माल पुरवतात.हवामान नियंत्रण: जंगले आणि जलस्रोत तापमान नियंत्रित ठेवण्यास आणि नियमित पाऊस पडण्यास मदत करतात. वाढत्या प्रदूषणामुळे आणि वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे आणि हवामान बदलासारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. म्हणूनच झाडे लावणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि पाण्याचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाच्या अभ्यासाविषयी सविस्तर माहिती मिळवण्यासाठी आपण विकिपीडिया या अधिकृत स्रोताला भेट देऊ शकता. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपण कोणकोणत्या सोप्या पद्धतींचा वापर करू शकतो, पर्यावरण समतोल राखला तरच आपलं जग आणि जीवन व्यवस्थित राहील, आज देशांमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, विविध वृक्षांची कत्तल होत आहे, नैसर्गिक नद्या ,ओढे यामध्ये प्रदूषण झाले आहे, प्रत्येक जण विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास करत आहे, हवा प्रदूषण, जल प्रदूषण, वायू प्रदूषण, होत असल्यामुळे दिवसेंदिवस उष्णता वाढत आहे,, दुष्काळ सारखी परिस्थिती निर्माण होत आहे, त्यासाठी वेळीच सर्वांनी जागे झाले पाहिजे, असे प्रोफेसर अशोक कोरडे यांनी मत व्यक्त केले,

गांधी महाविद्यालय कडा येथे पर्यावरण दिन उत्साहात साजरा,, जागतिक पर्यावरण दिन निमित्ताने महाविद्यालयामध्ये अमोलक देवराई मधील घनदाट औषधी वृक्षारोपण आहे, त्यामध्ये विविध वनस्पतींचे संवर्धन केले जाते, महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ जवाहरलाल भंडारी सर यांचे आदेशानुसार, प्रोफेसर डॉ शिवराज पातळे यांनी वृक्षारोपणाचे आयोजन केले.

## तोफखाना पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक, गुन्हेगारांना कडक संदेश देण्याची गरज – सचिन जगताप

### सावेडीतील घरफोडी व महिलांच्या छेडछाडीप्रकरणी आरोपीला अटक; गुणे आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्याकडून पोलिसांचे अभिनंदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरामध्ये घरफोडी आणि महिलांच्या छेडछाडीच्या गंभीर प्रकरणातील आरोपी विजय सुनील यलन याला तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केल्याबद्दल गुणे आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांची भेट घेऊन त्यांचे व संपूर्ण पोलीस पथकाचे अभिनंदन केले. तसेच या प्रकरणातील आरोपीवर कठोर आणि कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, अभिजीत खोसे, सुशील बजाज आदी उपस्थित होते.



सावेडी परिसरात घडलेल्या घरफोडी आणि महिलांच्या छेडछाडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः महिला आणि कुटुंबीयांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर तोफखाना पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी बोलताना सचिन जगताप म्हणाले की, महिलांच्या सुरक्षिततेला आणि नागरिकांच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. सावेडी परिसरात घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असून अशा प्रकारचे गुन्हे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करतात.

ते पुढे म्हणाले की, तोफखाना पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत तत्परतेने तपास करून आरोपीला अटक केली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. मात्र अशा आरोपींवर केवळ अटक करून थांबता कामा नये, तर त्यांच्यावर अशी कठोर कारवाई झाली पाहिजे की पुन्हा कोणत्याही गुन्हेगाराला अशा प्रकारचा गुन्हा करण्याचे धाडस होणार नाही.

महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचवणाऱ्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या प्रवृत्तींना कायद्याचा कठोर धाक बसणे आवश्यक आहे. पोलिसांनी दाखविलेली तत्परता समाजासाठी आश्वासक असून नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करणारी आहे, असेही ते म्हणाले.

सावेडी परिसरातील नागरिकांनीही या कारवाईचे स्वागत करत पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल समाधान व्यक्त केले. गुन्हेगारांविरोधात तातडीने आणि कठोर पावले उचलल्यास कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेविरोधात आरबीआय लोकपालांकडे तक्रार



अहिल्यानगर - बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेच्या कामकाजाबाबत काही आक्षेप नोंदवत ग्राहक गणेश इंगळे यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) एकात्मिक लोकपाल योजनेअंतर्गत तक्रार दाखल केली असून, मृत खातेदाराच्या दाव्याच्या निपटाऱ्यात झालेला कथित विलंब, माहिती उपलब्ध करून देण्याबाबतची भूमिका तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेदरम्यान कथित शुल्क आकारणीच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.तक्रारदार गणेश इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत खातेदाराच्या वारसदाराच्या नात्याने आवश्यक कागदपत्रे एप्रिल २०२६ मध्ये शाखेत सादर करण्यात आली होती. संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर दावा निकाली निघण्याबाबत शाखेकडून सकारात्मक माहिती देण्यात आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तथापि, उर्वरित प्रक्रिया पूर्ण होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागल्याचा दावा त्यांनी केला आहे.तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, विलंबाबाबत स्पष्ट लेखी माहिती मिळाली नसल्याने त्यांनी वारंवार शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी आरबीआयच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल केली. तक्रारीवरील बँकेच्या उत्तरामध्ये ‘‘ग्राहक पुढील प्रक्रियेसाठी शाखेत आला नाही’’ असे नमूद करण्यात आल्याचे तक्रारदाराने सांगितले असून, संबंधित कारणाबाबतही स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय, शाखेशी संलग्न असलेल्या बिझनेस करस्पाँडंट (बीसी) मार्फत खाते उघडण्याच्या प्रक्रियेत काही ग्राहकांकडून रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या बाबींची सत्यता पडताळून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी संबंधित यंत्रणेकडे केली आहे.

### मिरीतील आदिवासी भिल्ल कुटुंबांना घरकुल व शेतीसाठी जागा द्या



अहिल्यानगर - पाथर्डी तालुक्यातील मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी शेती करण्याकरिता शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. एकलव्य भिल्ल संघटनेचे संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजंता गोलवाड तथा नाशिक विभागाचे सभापती शिवाजी ढवळे व चेअरमन अनिल गोलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सयाजी पवार, सविता पवार, राजेंद्र माळी, आसराबाई माळी, रमेश पवार, सुनीता पवार, सोनू दळवी, अनिता दळवी, गंगा पवार, शहाजी पवार, शहादेव पवार, अंकुश पवार, जिजाबाई पवार, बाबासाहेब माळी, भाऊसाहेब पिंपळे, दुर्गा पिंपळे, रामकिसन माळी, शत्रुघ्न माळी, सोनाली माळी, सुनीता माळी, मनीषा माळी, कचरू माळी, कृष्णा माळी, मीरा माळी, विक्रम माळी, आशाबाई माळी, शरद पवार, परमेश्वर पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मिरी गावात आदिवासी भिल्ल समाजाची अनेक कुटुंबे वास्तव्यास असून त्यांचा प्रमुख व्यवसाय मोलमजुरी आहे. मात्र या कुटुंबांकडे स्वतःची शेती किंवा राहण्यासाठी जागा नसल्याने त्यांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अनेक कुटुंबांना कायमस्वरूपी निवाऱ्याअभावी भटकंतीचे जीवन जगावे लागत असून मुलांच्या शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

# आदर्श शिक्षक पुरस्काराने प्राचार्य योगेश भुसारी यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील समाजात एक जागरूक नागरिक म्हणून वावरताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे पवित्र कार्य अविरतपणे करणारे, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालय, ढवळपुरीचे प्राचार्य प्रा. योगेश शंकर भुसारी यांना सन २०२६ चा ‘‘आदर्श शिक्षक पुरस्कार‘‘ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

आदर्श गाव निमगाव वाघा येथे आयोजित भव्य हरिनाम सप्ताहाच्या शुभप्रसंगी ह.भ.प. आदरणीय डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

प्रा. योगेश भुसारी यांचे कार्य केवळ शालेय व महाविद्यालयीन शिक्षणापुरते मर्यादित नसून ते एक उत्कृष्ट कीर्तनकार, प्रवचनकार आणि समाजप्रबोधनकार म्हणूनही ओळखले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये व भरती प्रक्रियांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागात कीर्तन, प्रवचन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. शिक्षणासोबतच संस्कार, मूल्ये आणि समाजसेवेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्था यांच्या वतीने त्यांना हा प्रतिष्ठेचा ‘‘आदर्श शिक्षक पुरस्कार‘‘ प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव असून शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

### सकल माळी समाज ट्रस्टची बैठक संपन्न

## माळीवाडा पंचमंडळ देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी – डागवाले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रसाद कोके यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने माळी समाजासाठी सभासद नोंदणी सुरू करावी.या मागणीसाठी उपोषण केले होते.यावेळी सकल माळी समाजाने मध्यस्थी केली होती.व प्रसाद कोके यांनी उपोषण थांबवले.श्री कोके यांची मागणी रास्त असल्याने सकल माळी समाजाने त्याचा मागणीचा पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे.शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थान चे सभासदत्व मिळावे.अशी माळी समाज बांधव मागणी करीत आहे.धार्मिक कार्याची आवड असल्याने व श्रीगणेशा ची सेवा करण्याची संधी मिळावी.ही प्रत्येक समाजबांधवाची मनोभावे इच्छा आहे. माळीवाडा पंचमंडळ देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी. अशी मागणी सकल माळी समाज ट्रस्ट च्या बैठकीत ठरले असल्याचे प्रतिपादन सकल माळी समाज ट्रस्ट चे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

माळीवाडा येथील महालक्ष्मी मंदिरात माळीवाडा पंच मंडळ ट्रस्ट श्री विशाल गणेश देवस्थान ने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी.या मागणीसाठी सकल माळी समाज ट्रस्ट ची बैठक संपन्न झाली.या बैठकीत सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे,विनोद पुंड,कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे,प्रकाश इवळे, अमोल भांबरकर,अखिल भारतीय समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, साहेबराव विधाते,नारायण इवळे,सुधाकर कानडे, विनायकराव कोके,राजेंद्र ताठे,प्रकाश इवळे,संजय कानडे, गणेश कोल्हे,प्रसाद कोके,जालिंदर खंदारे,मनोज भुजबळ,अशोक हजारे,रामदास खंदारे,सचिन एकाडे,संजय ताजणे,प्रकाश रासकर,भास्कर खंदारे,अर्जुन गोंधळे,अशोक हिंगे,कल्याणी गाडळकर, रेणुका पुंड आदी उपस्थित होते.

विनायकराव कोके म्हणाले,हा लढा मी वैयक्तिक स्वार्थासाठी उभारला नसून समाज हितासाठी सभासद नोंदणी सुरू करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे.माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने मला विश्वस्त करून माझ्या घरातील सभासद नोंदणी करण्याचे आमिष दिले होते.परंतु माळी समाज घटकांना समाविष्ट करावे.ही मागणी मी केलेली आहे.तसेच जे सभासद मयत झाले आहे. त्यांच्या वारसांना देखील सभासद करुन घ्यावे.

प्रकाश इवळे म्हणाले,कोके बंधूंनी माळीवाडा पंच मंडळ देवस्थान ने सभासद नोंदणी सुरु करावी.या मागणीसाठी लढा उभारला आहे.या लढ्याला माळी समाजाने पाठिंबा द्यावा.कोके यांनी निस्वार्थपणे माळी समाजाचे बांधव व भगिनींसाठी सभासद नोंदणी करून घ्यावी. अशी मागणी केली आहे.ही मागणी रास्त असल्याने समाज त्यांच्यासोबत आहे.

डॉ.रणजीत सत्रे म्हणाले, ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थाने सर्वांचे आराध्य दैवत आहेत.बालिकाश्रम रोड सुडके मळा, जाधव मळा,बोरुडे मळा,ताठे मळा या परिसरातील समाज बांधवांना माळीवाडा पंच मंडळ देवस्थानचे सभासद होण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.व धार्मिक कार्यात सहभागी करून घ्यावे.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले,कोके पाटील यांनी उभारलेला लढा हा वैयक्तिक नसून तो समाजासाठी असल्याने समाजाने सामूहिक निर्णय घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे.तसेच माळी समाजासाठी सभासद नोंदणी खुली करावी.या मागणीसाठी सकल माळी समाजाचे शिष्टमंडळ प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे.यावेळी सचिन एकाडे,राजेंद्र पडोळे,अशोक हिंगे,राजेंद्र ताठे आदींनी मनोगत व्यक्त केले.

## राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत नगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

### अहिल्यानगरच्या ७ नेमबाजांची सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील खेळाडूंनी मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत पदकांची कमाई करुन उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. अहिल्यानगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या तब्बल ७ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत सब नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात किर्ती चक्रवर्ती हिने कास्य पदक मिळवले. तसेच ५० मीटर ३ पोझीशन रायफल प्रकारात कार्तिक कोल्हे याने चौथ क्रमांक मिळवला. आयुष काळे, आदेश खर्डे, पार्थ शिंदे यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला.

या खेळाडूची गोवा येथे होणाऱ्या सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली असून या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच खेळाडूंना हे यश मिळवता आले आहे. या यशाबद्दल खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांनी खेळाडूंना पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

## बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी आ. दातेंचा पुढाकार

### १८६ कामगारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासन राबवत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने तालुक्यातील १८६ बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार दाते सर यांनी उपस्थित बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्य संच, गृहउपयोगी साहित्य संच, विवाह सहाय्य योजना, प्रसूती लाभ योजना, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना, गंभीर आजार उपचार सहाय्य, अपंगत्व सहाय्य, नैसर्गिक मृत्यू व अपघाती मृत्यू सहाय्य, वृद्धापकाळ पेन्शन, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत तसेच घरकुलासाठी विविध स्वरूपाचे लाभ उपलब्ध करून दिले जात आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी सर्व बांधकाम कामगारांनी अधिकृत नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. मतदारसंघातील बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणारे आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार तसेच मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार.

## नेप्ती गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची जोरदार मागणी; सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरासाठी ग्रामस्थांचा प्रशासनाकडे एल्गार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती गावाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून गावाचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर होत आहे. गावामध्ये शैक्षणिक संस्था, व्यापारी आस्थापने, सार्वजनिक ठिकाणे तसेच विविध सामाजिक उपक्रम सातत्याने वाढत आहेत. मात्र या वाढत्या वर्दळीच्या पार्श्वभूमीवर गावाच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे गावातील प्रमुख चौक, रस्ते, शाळांच्या परिसरात तसेच सार्वजनिक ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल चौगुले व रामदास फुले यांनी ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ यांच्याकडे केली.

यावेळी माजी उपसरपंच जालिंदर शिंदे ,ज्ञानेश्वर जपकर, सोसायटी सदस्य सुरेश कदम, विष्णू गुंजाळ, रामदास कोल्हापूरे, बापू साळवे ,हनुमंत साळवे , सोमनाथ ठुबे, शिवम पवार व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी ग्रामसेवकाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ,सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यास गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.गावामध्ये अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दररोज ये-जा करत असतात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून शाळा सुटल्यानंतर किंवा सकाळच्या वेळेत अनेक ठिकाणी गर्दी होत असते. अशा परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य होईल. विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. कोणतीही अनुचित घटना घडल्यास संबंधित व्यक्तींची ओळख पटविणे आणि तपास करणे अधिक सुलभ होईल, असे ग्रामस्थांचे मत आहे.



गेल्या काही काळात गावामध्ये किरकोळ चोरी, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, रात्रीच्या वेळी होणारी संशयास्पद वर्दळ तसेच वाहतुकीशी संबंधित काही समस्या समोर आल्या आहेत. अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्यास अशा घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवरही यामुळे मानसिक दबाव निर्माण होऊन गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होईल, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

गावातील मुख्य चौक, ग्रामपंचायत परिसर, बाजारपेठ, बसथांबा, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे तसेच प्रवेशद्वारांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या माध्यमातून गावात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांवर देखील नजर ठेवता येणार आहे. आपत्कालीन परिस्थिती किंवा अपघाताच्या घटनांमध्ये कॅमेऱ्यांचे फुटेज तपासासाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरू शकते. त्यामुळे ही यंत्रणा केवळ सुरक्षा नव्हे तर प्रशासनाला मदत करणारे प्रभावी साधन ठरणार आहे.

डिजिटल आणि स्मार्ट गावाच्या संकल्पनेला चालना देण्यासाठीही सीसीटीव्ही व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकते. राज्यातील अनेक गावांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षेच्या बाबतीत उल्लेखनीय पावले उचलली आहेत.

## उच्च दर्जाच्या विकासकामांमुळे नगर शहराचा चेहरामोहरा बदलत आहे - आमदार संग्राम जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराच्या मध्यवर्ती भागातील जुना कापड बाजार परिसरातील बहुप्रतीक्षित कॉंक्रिटीकरण रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. नगरसेवक अविनाश घुले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे हे काम मंजूर झाले असून माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून हे काम होत आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या समस्या दूर होणार आहेत. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर या विकासकामाला प्रारंभ झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या शुभारंभ कार्यक्रमाला उपमहापौर धनंजय जाधव, प्रशांत मुथा, किशोर डागवले, मनोज लोंढे, रोहन डागवाले , श्रीकांत बोरा, राजेंद्र तातेड, कमलेश मुथा, ललित पारीख , मयूर पारीख ,राजेंद्र मिसाळ, जितेंद्र बोरा , राजेश झालनी , अजहर पटवेकर, दर्शन शहा, स्वप्नील गांधी, अभय बोरा यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत परिसराच्या विकासासाठी आणखी कामे होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री स्व अजितदादा पवार यांच्या माध्यमातून नगर शहराला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. या निधीच्या सहाय्याने शहरातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांची कामे, पाणीपुरवठा योजनांची उभारणी, ड्रेनेज लाईनची कामे आणि इतर नागरी सुविधा उभारण्याचे काम करण्यात आले आहे. या विकासकामांमुळे शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा झाली आहे

जगताप म्हणाले की, काही वर्षांपूर्वी नगर शहरात पावसाळा सुरू झाला की अनेक भागांमध्ये पाणी साचण्याची समस्या निर्माण होत असे. अनेक नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत होते. व्यापारी, विद्यार्थी आणि कामगार वर्गाला याचा मोठा फटका बसत होता. दोन-दोन दिवस पाणी न निघाल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. मात्र नियोजनबद्ध पद्धतीने ड्रेनेज व्यवस्था सुधारण्यात आली आणि मोठ्या प्रमाणावर कॉंक्रिटीकरण रस्ते करण्यात आल्याने ही परिस्थिती बदलली आहे. पूर्वीचे डांबरी रस्ते पावसाच्या पाण्यामुळे वारंवार खराब होत होते.

# पाबळचे नायब सुबेदार संतोष (अमोल) गोर्डेंना लष्करप्रमुखांचा सन्मान

## आमदार काशिनाथ दाते सरांकडून अभिनंदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पाबळ ता. पारनेर येथील भारतीय सैन्यात कार्यरत असलेले नायब सुबेदार संतोष (अमोल) देवराम गोर्डे यांना उत्कृष्ट कामगिरी व देशाप्रती निःस्वार्थ सेवेसाठी भारतीय लष्करप्रमुखांकडून प्रदान करण्यात येणाऱ्या ‘‘ ‘‘ या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरविण्यात आले आहे. या सन्मानाची घोषणा २२ मे २०२६ रोजी नवी दिल्ली येथे करण्यात आली.

भारतीय सैन्याच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अवघ्या ८६ सैनिकांमध्ये नायब सुबेदार संतोष गोर्डे यांची निवड होणे ही पाबळसह संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

> **पाबळच्या सुपुत्राने भारतीय सैन्यात केलेली उल्लेखनीय कामगिरी आणि मिळविलेला राष्ट्रीय स्तरावरील सन्मान हा संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे. नायब सुबेदार संतोष गोर्डे यांनी आपल्या कर्तृत्वाने युवकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. देशसेवेसाठी समर्पित असलेल्या अशा जवानांचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.**
>
> **आमदार काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

नौदलात उत्कृष्ट सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले मेजर देवराम गोर्डे यांचे सुपुत्र संतोष गोर्डे यांनीही देशसेवेचा वारसा समर्थपणे पुढे नेत भारतीय सैन्यात आपल्या कर्तृत्वाची वेगळी छाप निर्माण केली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांची नायब सुबेदार पदावर नियुक्ती झाली होती. त्यानंतर अल्पावधीतच मिळालेला हा राष्ट्रीय सन्मान त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि देशभक्तीची साक्ष देणारा आहे. सध्या ते नवी दिल्ली येथील सैन्य मुख्यालयाच्या विदेश विभागात कार्यरत असून देशहिताच्या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

यावेळी राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे सर, शिवराज कदम, विश्वनाथ कवडे सर, पांडूरंग कवडे सर, डॉ. भास्करराव शिरोळे, डॉ. सुरेश उचाळे, संतोष कापसे, राजेंद्र कवडे, कैलास कवडे, नाथा कापसे, भरत गोर्डे, भाऊसाहेब गोर्डे, पोपट महाराज गोर्डे, पोपट महाराज कापसे, म्हातारबा महाराज गोर्डे, शिवराम कापसे, लक्ष्मण मामा गोर्डे, मेजर देवराम गोर्डे, बाळासाहेब दरेकर, ज्ञानदेव गोर्डे, मच्छिंद्र दरेकर, बन्शी कवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

नायब सुबेदार संतोष (अमोल) गोर्डे यांच्या या यशामुळे पाबळ परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिवरायांच्या शौर्यपरंपरेचा वारसा जपणाऱ्या खेळाडूंचा सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पमधील सहभागी खेळाडूंचा मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमास मान्यवर, पालक आणि खेळाडूंची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे दि. २० मे ते ५ जून २०२६ या कालावधीत श्री श्रमिक बालाजी मंदिर परिसर तसेच श्री मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा येथे एकाच वेळी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना लाठी-काठी, दांडपट्टा, तलवारबाजी आणि मल्लखांब यांसारख्या भारतीय परंपरेचा अभिमान असलेल्या युद्धकला व क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अकॅडमीच्या वर्षा म्याकल यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आजचे विद्यार्थी हे उद्याचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत. सोहम स्पोर्ट्स अकॅडमीतील खेळाडूंनी भविष्यात राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करून शहराचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

श्रमिकनगर परिसरातील लोकप्रिय नगरसेवक तसेच सोहम स्पोर्ट्स अकॅडमीचे खंबीर पाठीराखे मनोजभाऊ दुलम यांनी अकॅडमीच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात मुलांना मैदानी खेळांकडे वळविण्याचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय पारंपरिक खेळांमध्ये मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पालकांचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले.

अकॅडमीचे प्रशिक्षक योगेश म्याकल यांनी सांगितले की, खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी अकॅडमी सातत्याने प्रयत्नशील आहे. विशेषतः मुलींसाठी स्वरक्षणाच्या दृष्टीने लाठी-काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण ही काळाची गरज बनली आहे. आत्मविश्वास, शारीरिक सक्षमता, मानसिक धैर्य आणि संकटसमयी स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता या प्रशिक्षणातून विकसित होते. त्यामुळे पालकांनी सुट्टीच्या काळात मुलांना केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित न ठेवता अशा पारंपरिक युद्धकला प्रशिक्षणामध्ये सहभागी करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रशिक्षक सुरेश जाधव यांनी मल्लखांब, लाठी-काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजी या भारतीय पारंपरिक क्रीडा व युद्धकलांचे महत्त्व विशद केले. मल्लखांब हा शरीरसौष्ठव, संतुलन, लवचिकता आणि एकाग्रता वाढविणारा खेळ असून तो भारताच्या गौरवशाली क्रीडा परंपरेचे प्रतीक आहे.

# मोहरम उत्सवासाठी प्रशासनाने तातडीने पूर्वतयारी करावी

## आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन । ४५० वर्षांच्या ऐतिहासिक परंपरेच्या मोहरम उत्सवासाठी सुरक्षा, सुविधा आणि समन्वय बैठकीची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सर्वधर्मसमभावाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या मोहरम (सवारी) उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नागरी सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासनाच्या पूर्वतयारीबाबत आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. उत्सव काळात उद्भवणाऱ्या विविध समस्या, भाविकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न तसेच प्रशासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजनांकडे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, फैरोज पठाण, दानिश शेख, सहारा सोशल क्लबचे अध्यक्ष अजीम राजे, शहाबाज शेख, साजिद जहागीरदार, अकबर अली शेख यांच्यासह मुस्लिम समाजातील युवक उपस्थित होते.

शहरात सुमारे ४५० वर्षांहून अधिक काळाची मोहरम उत्सवाची गौरवशाली परंपरा लाभली आहे. शहरातील मोहरम उत्सव हा त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक परंपरा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी देशभरात प्रसिद्ध आहे. कोठला, सर्जेपुरा, हवेली, जुने शहर, कापड बाजार, दिल्लीगेट आदी भागांतून निघणाऱ्या सवाऱ्यांच्या दर्शनासाठी तसेच लंगर आणि सरबत वाटपच्या सेवांमध्ये सहभागी होण्यासाठी लाखो भाविक शहरात दाखल होत असतात. या ऐतिहासिक आणि संवेदनशील उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी आणि भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मिरवणुकीच्या प्रमुख मार्गांवरील खड्डे डांबरीकरण करून तातडीने बुजवावेत, अतिक्रमणे हटवावीत तसेच अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. सवाऱ्यांच्या उंचीचा विचार करून मार्गावरील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. महावितरण विभागाने मिरवणूक मार्गांवरील खाली लोंबकळणाऱ्या उच्च व कमी दाबाच्या वीजतारा तातडीने उंच कराव्यात अथवा त्यांचे सुरक्षित इन्सुलेशन करावे, अशी मागणी करण्यात आली. उत्सवाच्या प्रमुख दिवशी अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबरोबरच महानगरपालिकेने बंद पडलेले स्ट्रीट लाईट्स व हायमास्ट दिवे तातडीने कार्यान्वित करावेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

# श्री गजानन महाराज मंदिर हे आध्यात्मिकतेचे, संस्काराचे आणि सामाजिक एकात्मतेचे केंद्र - आमदार जगताप

## केडगाव भूषण नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून सभामंडप कामाचे भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मंदिरे ही केवळ श्रद्धेची केंद्रे नसून समाजाला एकत्र आणणारी, विचारांची देवाण-घेवाण घडवून आणणारी आणि सकारात्मकतेची ऊर्जा देणारी पवित्र स्थळे आहेत. श्री गजानन महाराज मंदिरात आल्यानंतर मन प्रसन्न होते, चांगल्या विचारांची प्रेरणा मिळते आणि समाजसेवेची उर्मी निर्माण होते. त्यामुळेच केडगाव भूषण नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम अधिक सुसज्ज पद्धतीने पार पडावेत यासाठी सभामंडपाचे काम मंजूर करण्यात आले असून त्याचे भूमिपूजन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

केडगाव भूषण नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारण्यात येणाऱ्या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन माजी प्राचार्य शरद कोलते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप, नगरसेवक विजय मोहिते, माजी नगरसेवक संभाजी पवार, विकी वाघ, गणेश कुंभारे, सचिन गोळे, डॉ. दत्तात्रेय लोडे, अनिल



डुमणे, मिलिंद वडाळकर, शंकर खोमणे, विजय कुदळे, आनंद किनोर, डॉ. निलेश बकाल, अनिल साळवे, श्रीकृष्ण भसले, उत्तम सराफ, विजय पडोळे, स्नेहा पटेल, स्वाती वडाळकर, सागर कोकणे, तुळशीराम जाधव, नंदकिशोर आठरे आदींसह भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विदर्भ मित्र मंडळाच्या माध्यमातून श्री गजानन महाराज मंदिराची अत्यंत भक्तिभावाने सेवा केली जात आहे. प्रत्येकाने सकारात्मक विचार आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन काम केल्यास यश निश्चित मिळते. मंदिर परिसरातील धार्मिक वातावरण समाजाला योग्य दिशा देणारे आहे. या सभामंडपामुळे विविध धार्मिक सोहळे, प्रवचने, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम अधिक भव्य स्वरूपात आयोजित करता येतील.

ते पुढे म्हणाले की, केडगाव लिंक रोड हा अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठा आणि सरळ रस्ता असून भविष्यात या परिसरात मोठी बाजारपेठ विकसित होण्याची क्षमता आहे. शहराच्या विकासाबरोबरच धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी माजी प्राचार्य शरद कोलते यांच्या कार्याचा विशेष गौरव करत सांगितले की, शैक्षणिक क्षेत्रात शरद कोलते सर यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांनी अनेक गुणवंत विद्यार्थी घडवून समाजाला दिले आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमात बोलताना माजी प्राचार्य शरद कोलते म्हणाले की, आमदार संग्राम जगताप हे आपल्या वडिलांचा विकासाचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात आहेत. कार्यक्रम कोणताही असो, त्या क्षेत्राचे ज्ञान आणि अभ्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. समाजातील प्रत्येक घटकाशी संवाद साधत विकासकामे करण्याची त्यांची कार्यपद्धती कौतुकास्पद आहे.

ते पुढे म्हणाले की, श्री गजानन महाराज मंदिर परिसरातील ओपन स्पेस जागेचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी माझी अपेक्षा आहे. या परिसराचा अधिक विकास झाल्यास भाविकांना आणि नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. सभामंडपासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विदर्भ मित्र मंडळाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

भूमिपूजन सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी सभामंडप उभारणीच्या निर्णयाचे स्वागत करत यामुळे मंदिर परिसरातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. श्री गजानन महाराजांच्या जयघोषात आणि मंगलमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# जाधव स्मृती पुरस्कार डॉ. घोडेराव यांना जाहीर!

## ग्रंथाचेही होणार प्रकाशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कॉम्रेड भास्कर जाधव स्मृती अभिवादन पुरस्कार या वर्षी लेखक व कवी डॉ. विवेक घोडेराव यांना जाहीर झाला आहे.

कॉम्रेड भास्कर जाधव प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलिमा जाधव - बंडेलू, कॉं. भीमराव बनसोड यांनी ही माहिती दिली आहे. येत्या १८ जूनला नगर येथे एका कार्यक्रमात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते दिला जाईल.स्मृतीचिन्ह ,रोख रक्कम आणि ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. याच कार्यक्रमात ‘‘श्रमिक विचारचे अंतरंग‘‘ या ग्रंथाचेही यावेळी प्रकाशन होणार असल्याचे जाधव - बंडेलू यांनी सांगितले. पुरस्कारार्थी डॉ. घोडेराव हे २६ वर्षांपासून मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.बोधेगाव येथील आबासाहेब काकडे महाविद्यालयात तसेच ते शिरूर येथेही एका महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.ते महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे अनेक वर्षे प्रमुख तसेच महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे संपादन ते संपादन करीत. अनेक दिवाळी अंक, दैनिकात त्यांचे साहित्य, प्रसिद्ध झालेले आहे. दलित, कामगार, कष्टकरी, आदी विविध विषयावरील त्यांचे लेखन आहे. पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहेत.

(पान १ वरुन)

# सर्जेपुरा चौकातील राजमाता मिलच्या पार्किंगमध्ये चोऱ्यांचे सत्र

सर्जेपुरा चौक येथे राजमाता मिल हे साड्यांचे दालन आहे. या ठिकाणी खरेदीसाठी महिला वर्ग मोठ्या संख्येने येत असतो. परंतु व्यवस्थापनाच्या बेजबाबदारपणामुळे येथील पार्किंगमध्ये चोरी झाल्याचा प्रकार उघड झाला आहे. काल दुपारी एक महिला ग्राहक साडी खरेदीसाठी दुकानात आली होती. तिची मोपेड दुचाकी पार्किंगमध्ये ठेवून ती खरेदीसाठी दुकानात आली. सुमारे तासभर दुकानात खरेदी केल्यानंतर पार्किंगमध्ये आली असता दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेला मोबाईल चोरीला गेल्याचे दिसून आले. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मोबाईल चोरणारा तोंडाला रुमाल बांधलेला चोरटा या पार्किंगमध्ये तब्बल तासाभरापेक्षा जास्त वेळ ठाण मांडून असल्याचे दिसून आले. पार्किंगच्या व्यवस्थेसाठी येथे तीन सुरक्षारक्षक नेमलेले आहेत. परंतु सुमारे एक तासाच्या कालावधीत एकाही सुरक्षारक्षकाने पार्किंगमध्ये नेमके काय चालले आहे, याकडे डोकावूनही पाहिले नसल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून पुढे आल्याने संताप व्यक्त होत आहे.

# सीना नदी रुंदीकरण कामाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप यांच्याकडून पाहणी

त्यामुळे नदीचे पुनरुज्जीवन ही काळाची गरज बनली होती. आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी पुढाकार घेतल्यामुळे आज प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर अंतरातील काम सुरू असून पुढील काळात संपूर्ण १४ किलोमीटर नदीचे रुंदीकरण, खोलीकरण आणि अतिक्रमण निर्मूलनाचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आसून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. १४ किलोमीटर नदीपात्रातील अतिक्रमणे हटविणे, रुंदीकरण आणि खोलीकरणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून आवश्यक ती कारवाई केली जाईल.

महापालिका निवडणुकीच्या काळात नागरिकांना सीना नदीच्या विकासाचे आश्वासन दिले होते. आज त्या आश्वासनाची प्रत्यक्ष पूर्तता होताना दिसत आहे. शहरातील अनेक नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अतिक्रमणांमुळे थांबला असून त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचणे, दुर्गंधी निर्माण होणे आणि आरोग्याच्या समस्या वाढणे अशा अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शहरातील नाले अतिक्रमणमुक्त करून पुन्हा प्रवाही केले जाणार आहेत. शहरातील सांडपाण्यावर शंभर टक्के प्रक्रिया करूनच ते नदीमध्ये सोडणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी ही अत्यंत महत्त्वाची बाब असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. या कामासाठी अधिक निधीची आवश्यकता भासल्यास तो उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सीना नदी ही अहिल्यानगर शहराची जीवनवाहिनी असून अनेक वर्षांपासून दुर्लक्ष, अतिक्रमणे आणि प्रदूषणामुळे तिचे अस्तित्व धोक्यात आले होते. शहराच्या भविष्यासाठी आणि पर्यावरणीय संतुलनासाठी नदीचे पुनरुज्जीवन करणे अत्यावश्यक होते. त्यामुळे नदी रुंदीकरण, खोलीकरण आणि सुशोभीकरणाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले की, शहरातून वाहणाऱ्या संपूर्ण १४ किलोमीटर नदीपात्राचे नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाणार आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमणांमुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला आहे. काही भागात नदीचे पात्रच अरुंद झाले आहे. त्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होणे, पाणी साचणे आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागणे अशा समस्या उद्भवत आहेत. या सर्व समस्यांवर कायमस्वरूपी उपाय म्हणून नदीचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित केले जाणार आहे. सीना नदीचा विकास हा केवळ नदीचा विकास नसून संपूर्ण शहराच्या भविष्यासाठी उभारला जाणारा प्रकल्प आहे. नदी परिसराचे सुशोभीकरण झाल्यानंतर नागरिकांना फिरण्यासाठी, व्यायामासाठी, विरंगुळ्यासाठी आणि पर्यटनासाठी उत्कृष्ट जागा उपलब्ध होईल. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होईल.

त्यांनी प्रशासनाला कामाच्या गुणवत्तेबाबत विशेष सूचना देत सांगितले की, कामामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड सहन केली जाणार नाही. काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. नदीमध्ये सांडपाणी, कचरा आणि प्रदूषण रोखण्यासाठीही विशेष उपाययोजना केल्या जातील. नागरिकांनी देखील या मोहिमेत सहभागी होऊन सीना नदी सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# जिल्ह्यामध्ये महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये पीआय दर्जाचे अधिकारी नेमण्याची मागणी

सुव्यवस्थेची परिस्थिती अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच चोरी, दरोडे, खून, खंडणी, ताबामारी, बेकायदेशीर धंदे आदी गंभीर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करून वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका पोलीस ठाण्यांमध्ये पूर्णवेळ पीआय दर्जाचे अधिकारी नियुक्त करण्यात यावेत, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

# श्रीरामपूरमध्ये घरफोडी करणारे दोन सराईत एलसीबीकडून जेरबंद

बसल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचत दोघांना पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून साडेसहा लाख रुपये किमतीची ५० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड आणि गुन्ह्यात वापरलेली ४० हजार रुपयांची मोटारसायकल असा एकूण ६ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान आरोपींकडून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यातील आणखी एक घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

# सातासमुद्रापार दुमदुमला विठ्ठलनामाचा गजर!

एज्युकेशन'ची स्थापना करून शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.

**पंढरपूर ते लंडन पादुका यात्रेतून जन्मली ग्लोबल वारी**

गतवर्षी डॉ. खेडकर यांनी पंढरपूर येथून श्री विठ्ठलाच्या पादुका घेऊन २२ देशांमधून तब्बल १८ हजार किलोमीटरचा प्रवास केला होता. सुमारे ७० दिवस चाललेल्या या ऐतिहासिक यात्रेत त्यांनी कारद्वारे विविध देशांमध्ये विठ्ठल भक्तीचा संदेश पोहोचविला. या उपक्रमाला भारतीय समाजासह परदेशातील नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यातूनच 'ग्लोबल वारी'ची संकल्पना साकार झाली.

**लंडनमध्ये उभारणार पहिले भव्य विठ्ठल-रुक्मिणी मंदिर**

भारताबाहेर श्री विठ्ठल-रुक्मिणीचे भव्य आणि सर्वसमावेशक मंदिर उभारण्याचा संकल्पही डॉ. खेडकर यांनी केला आहे. युनायटेड किंगडममध्ये उभारण्यात येणारे हे मंदिर परदेशातील वारकरी संप्रदायाचे प्रमुख आध्यात्मिक केंद्र ठरणार असून, संत परंपरा आणि भारतीय संस्कृतीच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

या मंदिराच्या उभारणीसाठी जनजागृती करणे, जगभरातील वारकरी भक्तांना एकत्र आणणे आणि नव्या पिढीपर्यंत संतांचा विचार पोहोचविणे हा ग्लोबल वारीचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

**ढोल-ताशाच्या गजराची जागतिक नोंद**

भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी डॉ. खेडकर यांनी ढोल-ताशा परंपरेलाही जागतिक व्यासपीठ मिळवून दिले आहे. परदेशात एकाच वेळी २५० वादकांनी एकत्रितपणे ढोल वादन करून विक्रमी नोंद प्रस्थापित केली असून, या उपक्रमाची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

**पुरस्कारांनी गौरवलेले व्यक्तिमत्त्व**

सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. अनिल खेडकर यांना ४० अंडर युके बिजनेस प्रोफेशनल अवॉर्ड 'शिवप्रतिष्ठान प्रवर्तक पुरस्कार', 'अखंड भारत परिषद ग्लोबल वारकरी पुरस्कार' यांसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

**'पंढरीची वारी जगाच्या दारी' संकल्पना प्रत्यक्षात**

शेकडो वर्षांची वारकरी परंपरा आता महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून जागतिक स्तरावर पोहोचत असल्याचे चित्र या उपक्रमातून स्पष्ट होत आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या विचारांचा वारसा युरोपच्या भूमीवरून पंढरपूरकडे प्रवास करत असून, 'पंढरीची वारी जगाच्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याची भावना वारकरी भक्त व्यक्त करीत आहेत. विठ्ठल भक्ती, संत विचार आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देणारी ही 'ग्लोबल वारी' वारकरी संप्रदायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली जाणार आहे.